# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.09.2024** **वारःबुधवार**

---

1. सेमीकंडक्टर उद्योगासाठी स्थिर धोरणाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आश्वासन, मोदी यांच्या हस्ते आज ग्रेटर नोएडा इथं 'सेमिकॉन इंडिया 2024' परिषदेचं उद्घाटन
2. सायबर गुन्ह्यांना अटकाव घालण्यासाठी येत्या पाच वर्षांत पाच हजार सायबर कमांडोना प्रशिक्षण देण्याची योजना - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा
3. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात खनिज पुरवठा क्षेत्रातील सहकार्यासाठी सामंजस्य करार
4. 45 व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेला आजपासून हंगेरीची राजधानी बुडापेस्ट इथं सुरुवात आणि
5. महाराष्ट्रात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**पंतप्रधान -सेमीकंडक्टर**

वैविध्यपूर्ण सेमीकंडक्टरच्या पुरवठा साखळीमध्ये एक विश्वासार्ह भागीदार बनण्याची क्षमता भारताकडे आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत सेमिकॉन इंडिया परिषदेच्या पूर्वसंध्येला सेमीकंडक्टर क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. सेमीकंडक्टर संदर्भात केंद्र सरकार अपेक्षित असं स्थिर धोरण अवलंबणार असल्याची ग्वाही देखील पंतप्रधानांनी यावेळी दिली. मेक इन इंडिया आणि मेक फॉर द वर्ल्ड या धोरणावर भर देत केंद्र सरकार उद्योग क्षेत्राला पाठिंबा देत राहील, असंही पंतप्रधान म्हणाले.

**पंतप्रधान-उद्घाटन**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ग्रेटर नोएडा इथं सेमिकॉन इंडिया 2024 या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. 'सेमीकंडक्टरच्या उज्ज्वल भविष्यासाठी' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित ही परिषद तीन दिवस चालणार आहे. या परिषदेत भारताला सेमीकंडक्टरसाठीचं जागतिक केंद्र बनवण्याची कल्पना अधोरेखित करणारी रणनीती आणि धोरण अधोरेखित केलं जाईल. सेमीकंडक्टर उद्योगक्षेत्रातील जागतिक स्तरावरील अनेक दिग्गज या परिषदेत सहभागी होत आहेत. याशिवाय अडीचशेहून अधिक प्रदर्शक आणि दीडशे तज्ञ व्याख्याते या परिषदेत सहभागी होणार आहेत.

**अनुसंधान**

जागतिक समस्यांकरता स्थानिक पातळीवर उपाय शोधण्यावर भर द्यायला हवा असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत नव्यानं स्थापन झालेल्या 'अनुसंधान' या राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानच्या प्रशासक मंडळाच्या पहिल्या बैठकीत बोलत होते. संशोधन परिसंस्थेच्या मार्गात येणारे अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी पावलं उचलायला हवीत असंही पंतप्रधान म्हणाले. या संस्थेच्या नियामक मंडळानं मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहावं आणि संस्थेला केंद्रीय आणि विकेन्द्रित पद्धतीने कामकाज करता येण्यासाठी उच्च स्तरीय संस्था आणि विद्यापीठांच्या सहकार्यानं एक कार्यक्रम सुरू करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

**सायबर-कमांडो**

सायबर सुरक्षा हा राष्ट्रीय सुरक्षेचा अविभाज्य भाग असून केंद्राने सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी येत्या पाच वर्षांत पाच हजार सायबर कमांडोना प्रशिक्षण देण्याची योजना आखली आहे. अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंट-आय फोर सी-च्या अर्थात भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या पहिल्या

स्थापना दिनाच्या कार्यक्रमात दिली. सायबर गुन्ह्यांना सीमा नसल्यामुळे या धोक्याचा सामना करण्यासाठी सर्व संबंधितांनी एकत्र येण्याचं आवाहन शहा यांनी केलं.

**<u>भारत-युएईपूल</u>**

भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील व्यापारविषयक सामंजस्यासंबंधी दोन बाबींवर अबुधाबीचे राजपुत्र शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी सहमती दर्शवली आहे. यामध्ये भारत-यूएई व्हर्च्युअल ट्रेड कॉरिडॉर द्वारे मैत्री इंटरफेसवर व्हिटीसीची सुविधा देणं समाविष्ट आहे. तसंच खनिजांच्या पुरवठा साखळीतील लवचिकता वाढवण्यासाठी आरएससी लिमिटेड, ऑइल इंडिया लिमिटेड, खनिज बिदेश इंडिया लिमिटेड आणि ओएनजीसी इंडिया लिमिटेड यांच्यातील सामंजस्य करार करण्याचे निश्चित झाले आहे.

**<u>भारत-जर्मनी</u>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल बर्लिनमध्ये जर्मनीच्या परराष्ट्र मंत्री ॲनालेना बेरबॉक यांच्याशी विविध मुद्यांवर चर्चा केली. पश्चिम आशियातील परिस्थिती, विशेषत: गाझा संघर्ष आणि त्याचे परिणाम यासह व्यापार, गुंतवणूक, शाश्वत विकास, कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञान, संरक्षण आणि सुरक्षा या विषयांवर लक्ष केंद्रित करून भारत आणि जर्मनी यांच्यातील धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेण्यात आल्याचं जयशंकर यांनी या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. तसंच बर्लिनमधील परराष्ट्र कार्यालयाच्या वार्षिक राजदूतांच्या परिषदेत बोलताना डॉ जयशंकर म्हणाले की भारतीय खाजगी उद्योगांचा संरक्षण क्षेत्रातील विस्तार लक्षात घेता दोन्ही देशांनी संरक्षण सहकार्याचा अधिक विचार करायला हवा.

**<u>मंकीपॉक्स</u>**

एमपॉक्स आजाराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी केंद्र सरकारनं आवश्यक ती पूर्वतयारी केली असून सार्वजनिक आरोग्य धोरण सरकार राबवत आहे. एमपॉक्स हा पूर्वी मंकीपॉक्स म्हणून ओळखला जाणारा एक विषाणूजन्य रोग आहे ज्याची लक्षणं देवी रोगासारखीच आहेत, या रोगाची लक्षणं कमी तीव्रतेची असून सामान्यत: दोन ते चार आठवड्यांत स्वतःहून हा आजार बरा होतो. लहान मुलांमध्ये या विषाणूचा प्रादुर्भाव गंभीर असू शकतो, रुग्णाचं आरोग्य आणि आरोग्यविषयक गुंतागुंत यासारख्या घटकांवर या आजाराची गंभीरता अवलंबून असते. संक्रमित व्यक्तीशी दीर्घकाळ संपर्क आल्यामुळे किंवा शरीरातील द्रवपदार्थ, जखम तसंच कपडे किंवा दूषित वस्तूंशी थेट संपर्क आल्यानं त्याचा प्रसार होतो.

**<u>युरोपियन युनियन</u>**

युरोपियन युनियननं कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ए आय तंत्रज्ञानाच्या विकासाला चालना देण्यासाठी ए आय कारखाने स्थापन करण्याचं आवाहन केलं आहे. युरोपियन आयोगानं जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार, हे एआय कारखाने युरोपियन हाय-परफॉर्मन्स कॉम्प्युटिंग सुपर कॉम्प्युटरच्या नेटवर्कभोवती तयार केले जातील आणि स्टार्टअप्स, उद्योग आणि संशोधक यांना त्याचा लाभ घेता येईल. याशिवाय हे ए आय कारखाने युरोपियन युनियनच्या सदस्य देशांच्या ए आय उपक्रमांशी जोडले जातील आणि यामुळे एक संतुलित ए आय परिसंस्था निर्माण होण्याकरता मदत होणार आहे.

**<u>गडकरी-ईबसेस</u>**

देशात इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीत लक्षणीय वाढ होत असून 2030 पर्यंत वार्षिक विक्री एक कोटीपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. भारतीय वाहन उत्पादक संघाच्या 64 व्या वार्षिक अधिवेशनाला संबोधित करताना ते काल नवी दिल्लीत बोलत होते. देशात जवळपास 30 लाख ईव्ही इलेक्ट्रिक नोंदणीकृत वाहनं असल्याची माहितीही गडकरी यांनी दिली. केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एचडी कुमारस्वामी यांनी भारतीय वाहन उद्योग हा देशाच्या अर्थव्यवस्थेत 6 पूर्णांक 8 टक्के योगदानासह सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असल्याचं यावेळी बोलताना सांगितलं.

**क्षमता-बांधणी**

डिजिटल इंडिया उपक्रमाच्या वचनबद्धतेचा भाग म्हणून, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने क्षमता-निर्माण उपक्रमांचा तिसरा टप्पा सुरू केला आहे. हे उपक्रम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, करार आणि खरेदी व्यवस्थापन, कृत्रीम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचा वापर, मोठ्या डिजिटल परिवर्तन प्रकल्पांचं व्यवस्थापन, डिजिटल शासन आणि माहिती व्यवस्थापन यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतील. यादृष्टीने केंद्र आणि राज्य या दोन्ही स्तरावरील अधिकाऱ्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी देशभरात विशेष प्रशिक्षण कार्यक्रम मालिका आयोजित केली जाणार आहे.

**चौहान ग्रामीण विकास**

महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाखो लाभार्थ्यांना 2745 कोटी रुपयांचा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी झारखंड मधल्या जमशेदपूर इथे 15 सप्टेंबर रोजी वितरित करणार आहेत. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल ही माहिती दिली. यासोबतच सर्व लक्ष्यित लाभार्थ्यांना स्वीकृती पत्रांचं वाटपही यावेळी करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमात लोक मोठ्या संख्येने सहभागी होणार असून लाखो लोक ऑनलाइन पद्धतीने सहभागी होणार आहेत. चौहान यांनी राज्यांच्या ग्रामीण विकास मंत्र्यांची काल दूरस्थ पद्धतीनं बैठक घेऊन कार्यक्रमाच्या तयारीसाठी आवश्यक त्या सूचना दिल्या.

**बुद्धिबळ**

हंगेरीची राजधानी बुडापेस्ट इथे आजपासून आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाच्या वतीने 45 वी बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा सुरु होत आहे. या 12-दिवसांच्या द्वैवार्षिक स्पर्धेत 1,800 पेक्षा जास्त खेळाडू सहभागी होणार आहेत. यामध्ये खुल्या गटात 193 राष्ट्रीय संघांनी नोंदणी केली असून महिला गटात 181 संघ सहभागी होणार आहेत. अमेरिके-पाठोपाठ भारत खुल्या विभागात, द्वितीय मानांकित संघ म्हणून प्रवेश करेल. महिला विभागात, भारताच्या द्रोणवल्ली हरिकासारखी सक्षम बुद्धिबळपटू खेळणार आहे. भारताची नवी ग्रँडमास्टर आर. वैशाली ही दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल आणि तानिया सचदेव यांच्याबरोबर संघात सहभागी होणार आहे. जॉर्जियाच्या पाठोपाठ दुसरा मानांकित संघ असलेला भारत या स्पर्धेत प्रभावी कामगिरी करेल अशी आशा आहे. यापूर्वीच्या स्पर्धेचं यजमानपद भूषवणाऱ्या भारतानं खुल्या आणि महिला अशा दोन्हीही गटात, कांस्यपदक जिंकलं होतं.

**हवामान**

महाराष्ट्रात विदर्भात काही ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.